ePaper

वर्ष - 8 । अंक - 267 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शनिवार, दि. 26 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## विठ्ठल मंदिरात मोबाईल बंदीसह नव्या सुरक्षा योजना



**आतील पानांत**

- हैदराबादचा चेन्नईवर ऐतिहासिक विजय
- कामिंदू मेंडिसचा थक्क करणारा कॅच
- पाकिस्तानला पाणी देणार नाही
- २२९ पाकिस्तानी नागरिकांना माघारी

## जगावर भारत-पाकिस्तान युद्धाचे ढग गडद?

# पाण्यासाठी 'पाक' तरसणार!

## सिंधू' करार स्थगितीचा प्लॅन ठरला... पाकिस्तानवर 'वॉटर स्ट्राईक'

। मुंबई / पुणे / बीड । प्रतिनिधी । महाईन्यूज





पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताकडून पाकिस्तानवर मोठी कारवाई करत सिंधु नदी पाणी वाटप कराराला स्थगिती देण्यात आली आहे. सिंधू जल वाटप कराराला स्थगिती देण्यात आल्यानंतर पाकिस्तानचा चांगलाच थयथयाट पाहायला मिळाले. दरम्यान, सिंधु नदी पाणी वाटप कराराला स्थगिती देण्यात आल्यानं याचा पाकिस्तानला मोठा फटका बसणार आहे. अशातच सिंधू जल वाटप कराराबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. नुकतीच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय जलसंधारण मंत्री सी आर पाटील यांच्यात या संदर्भात महत्वाची बैठक पार पडली. यामध्ये भारत सरकार सिंधू जल वाटप कराराच्या स्थगितीची अंमलबजावणी नेमकी कशी करणार याची मोठी बातमी समोर आली आहे. या बैठकीनंतर जलसंधारण मंत्री सी आर पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. पाकिस्तानला एक थेंबही पाणी मिळणार नाही. तर सिंधू जल करार रद्द करण्याचा निर्णय तीन टप्प्यात होणार असल्याची माहिती देखील त्यांनी यावेळी दिली. तर जागतिक बँकेला देखील यांची संपूर्ण माहिती दिली जाणार असल्याचं जलसंधारण मंत्री सी आर पाटील यांनी म्हटलं आहे.

### आकाशात लढाऊ विमानांच्या घिरट्या, सैन्याचा कसून सराव

पहलगाम हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याला जशास तसे उत्तर द्यावे, अशी मागणी देशभरातून केली जात आहे. आता विचार करण्याचा काळ संपला सरकारने थेट निर्णय घेतला पाहिजे, असेही मत जनता तसेच काही राजकीय पक्षाचे नेते व्यक्त करत आहेत. असे असतानाच राजधानी दिल्लीत मोठ्या घडामोडी वाढल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्त्वात दिल्लीत उच्चपदस्थांसोबत बैठका चालू आहेत. सोबतच सीमेवर तिन्ही सैन्यदलं सज्ज झाली आहेत. त्यामुळेच आता युद्धाचे काळे ढग जमा झाले आहेत का? असा प्रश्न सगळीकडे विचारला जात आहे.

दिल्लीमध्ये नेमकं काय घडतंय?

पहलगाम हल्ल्यानंतर दिल्लीलमध्ये मोठ्या घडामोडी घडत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला परदेश दौरा अर्धवट सोडून थेट भारतात परतले आहेत. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्रमंत्री एस जयशंकर तसेच अन्य उच्चपदस्थ अधिकारी यांच्या उपस्थितीत अनेक बैठका पार पडल्या आहेत. पाकिस्तानची कोंडी करण्यासाठी भारताने मोठे पाच निर्णय घेतले आहेत. त्यानंतर प्रत्युत्तर म्हणून पाकिस्ताननेही भारताविरोधात मोठी पावलं उचलली आहेत. त्यामुळे आता या दोन्ही देशांतील तणाव कमालीचा वाढला आहे. असे असतानाच अमित शाहा यांनी देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबतही एक बैठक घेतली आहे. त्यामुळेच आता काहीतरी मोठे घडणार का? असा प्रश्न विचारला जात आहे.

### सैन्यदलेही हाय अलर्टवर

दुसरीकडे पहलगाम हल्ल्यानंतर भारताची तिन्ही सैन्यदले हाय अलर्टवर आहेत. भारतीय नौदल, भूदल, वायूदलाने युद्धाभ्यास चालू केला आहे. वायूदलातर्फे अरबी समुद्रात युद्धनौका तैनात करण्यात आल्या आहेत. सोबतच पाकिस्तानी हद्दीत काय घडत आहे, यासाठी भूदलाची काही विमानंही आकाशात घिरट्या घालत आहेत.

### 'पहलगाम'वरुन महाविकास आघाडीतील मतभेद

जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला घडवून आणला. यावेळी दहशतवाद्यांनी नाव विचारून गोळीबार केला, या हल्ल्यामध्ये 26 जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. दरम्यान, पहलगामवरून मविआमध्ये मतभेद सुरू असल्याचे दिसतंय. शरद पवार सरकारबरोबर तर उद्धव ठाकरेंच्या सेनेच्या निशाण्यावर सरकार असल्याचे पाहायला मिळतंय. पहलगाम मुद्द्यावर शरद पवार यांच्या वक्तव्यामुळे महाविकास आघाडीमध्ये मतभेदाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. तर आता दहशतवाद्यांना शोधणं हे महत्त्वाचं आहे. कुणाला काढा कुणाला ठेवा हे मी बोलणार नाही, असं शरद पवार यांनी स्पष्टपणे म्हटलंय. गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या प्रश्नावर त्यांनी हे उत्तर दिलं. दुसरीकडे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत रोज पहलगामवरून सरकारला घेरत असल्याचे दिसतंय. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्ताविरोधात महत्त्वाचे पाच निर्णय घेतल्यानंतर सरकारने एका सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले होते.

# ‘तलाव, पाणीसाठे वेळेत गाळमुक्त करा’!

## ‘मी पुन्हा येईन’ देवेंद्रजींना सल्ला देईन : अजित पवार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘जिल्ह्यातील पाणंदरस्ते, शिवरस्ते खुले करण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात यावा. तसेच, तलाव आणि पाणीसाठ्यातील गाळ काढण्याचे कामही वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन करावे,’ अशी सूचना उपमुख्यमंत्री, पालकमंत्री अजित पवार यांनी येथे केली.**

जिल्हा वार्षिक योजनेतील मंजूर कामांसाठी संबंधित यंत्रणांनी ३१ मे पर्यंत प्रशासकीय मान्यता घेऊन डिसेंबरअखेर कामे पूर्ण करावीत, असेही त्यांनी सांगितले. जिल्हा नियोजन समितीची बैठक अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी विधानभवन येथे झाली. राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांच्यासह सर्व आमदार आणि खासदार, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता अतुल चव्हाण, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर यावेळी उपस्थित होते.



जिल्ह्यातील सर्व तालुक्यात एकसारखा निधी दिला जाईल, याबाबत दक्षता घ्यावी. रुग्णालयात उपचारांसाठी लागणारी पुरेशी औषधे उपलब्ध ठेवावीत. धर्मादाय रुग्णालयांनी रुग्णांकडून अनामत रक्कम घेऊ नये, असा निर्णय घेण्यात आला आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात येईल, यासाठी जिल्हा प्रशासन, महानगरपालिका आयुक्त आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे, असे पवार यांनी स्पष्ट केले. यावेळी मंत्री श्री. पाटील, मंत्री श्री. भरणे, राज्यमंत्री श्रीमती मिसाळ, श्रीमती गोऱ्हे यांच्यासह आमदार यांनी विविध सूचना केल्या. जिल्ह्यासाठी सन २०२५- २६ च्या सर्वसाधारण योजनेसाठी १ हजार ३७९ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १४५ कोटी रुपये आणि आदिवासी घटक कार्यक्रमासाठी ६५ कोटी ४६ लाख रुपये या प्रमाणे एकूण १ हजार ५८९ कोटी ४६ लाख रुपयांच्या जिल्हा वार्षिक योजना आराखड्यास राज्य शासनाने मान्यता दिली असल्याचे माहिती जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी दिली.महाराष्ट्राच्या राजकारणाला साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा आहे. विरोधी पक्षनेते असताना ‘अर्थसंकल्प समजून घेताना’ हे पुस्तक लिहिले होते.

आता मुंबईत गेल्यावर ‘मी पुन्हा येईन’ हे आणखी एक पुस्तक लिहिण्याचा सल्ला मी देवेंद्रजींना देणार आहे,’ अशी मिश्कील टिप्पणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी केली.‘लोकसंवाद प्रकाशन’च्या वतीने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांच्या ‘ऐकलंत का

### अशी महाराष्ट्राची परंपरा आहे

या पुस्तकाचे प्रकाशन अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी पवार बोलत होते. क्रीडा राज्यमंत्री दत्ता भरणे, वात्रटीकाकार रामदास फुटाणे, आमदार शंकर मांडेकर, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, माजी आमदार दिलीप मोहिते, रमेश ढमाले, चंद्रकात मोकाटे, अतुल बेनके, रमेश थोरात, दत्ता घुले या वेळी व्यासपीठावर होते. पवार म्हणाले, ‘आपल्या राज्याला राजकारणाचा सुसंस्कृतपणा यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे लाभला आहे. तो टिकवला पाहिजे अशी महाराष्ट्राची परंपरा आहे. पूर्वीच्या काळात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये दोघांच्या भूमिका या वेगवेगळ्या असल्या, तरी आपलेपणा, ओलावा आणि जवळीक असायची.

# पुण्यात रेण्वीय निदान प्रयोगशाळा उभारणार!

## प्रकाश आबिटकर यांची घोषणा; जीवाणूसह विषाणू चाचणी सुविधा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यामध्ये साथरोग उद्रेक काळात जीवाणू व विषाणू चाचणी जलद गतीने करण्यासाठी पुण्यातील सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत रेण्वीय निदान प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे, अशी घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शुक्रवारी केली. आरोग्य विभागाच्या राज्य कुटुंब कल्याण भवन आणि प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे भूमिपूजन कार्यक्रमात आरोग्यमंत्री आबिटकर बोलत होते.**

राज्यात साथरोगाचा उद्रेक झाल्यास जीवाणू आणि विषाणूंची तपासणी करण्यासाठी नमुने राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत (एनआयव्ही) पाठवावे लागतात. नुकत्यात पुण्यात झालेल्या गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस)



उद्रेकावेळी पुण्यातील सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाणी नमुने तपासण्यासाठी यंत्रणाच नसल्याची बाब समोर आली होती. या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्र्यांनी सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत जीवाणू आणि विषाणू चाचणीसाठी रेण्वीय निदान प्रयोगशाळा उभारण्याची घोषणा केली आहे. यामुळे भविष्यात तातडीने जीवाणू आणि विषाणू चाचणी करणे आरोग्य विभागाला शक्य होणार आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने रुग्णालयांमध्ये स्वच्छता, आहार आणि रुग्णालयात वापरल्या जाणाऱ्या वस्त्रांची स्वच्छता हे अत्यंत महत्त्वाचे विषय आहेत. त्यामुळे राज्यातील ८ परिमंडळातील ५९३ आरोग्य संस्थांमध्ये यांत्रिक वस्त्र धुलाई सेवा केंद्रे लवकरच सुरू करण्यात येणार आहेत. याचबरोबर राज्य बोगस दिव्यांग प्रमाणपत्राबाबत चौकशीच्या सूचना दिलेल्या आहेत. याबाबत कारवाई सुरू असून, याची सरकारने गंभीर दखल घेतली आहे, असे आबिटकर यांनी सांगितले.दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील घटनेबाबत राज्य सरकारने आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग आणि न्याय विभाग या सर्वांच्या सूचना ऐकल्या आहेत. वैद्यकीय उपचारातील हलगर्जीपणाबाबत डॉक्टरांवर कारवाई झाली आहे. याचबरोबर रुग्णालयाला दंडही ठोठावण्यात आला आहे. भविष्यात राज्यातील सर्व रुग्णालयांमध्ये अशा पद्धतीने कुठल्याही रुग्णाला नाकारता येणार नाही, याचे धोरण आखण्यात आले आहे.

पुण्यात घडलेली घटना दुर्दैवी असून, नवीन धोरणाचा फायदा राज्यातील नागरिकांना होईल, असे आबिटकर यांनी नमूद केले.राज्यात साथरोगाचा उद्रेक झाल्यास जीवाणू आणि विषाणूंची तपासणी करण्यासाठी नमुने राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत (एनआयव्ही) पाठवावे लागतात. नुकत्यात पुण्यात झालेल्या गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) उद्रेकावेळी पुण्यातील सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत पाणी नमुने तपासण्यासाठी यंत्रणाच नसल्याची बाब समोर आली होती. या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्र्यांनी सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत जीवाणू आणि विषाणू चाचणीसाठी रेण्वीय निदान प्रयोगशाळा उभारण्याची घोषणा केली आहे. यामुळे भविष्यात तातडीने जीवाणू आणि विषाणू चाचणी करणे आरोग्य विभागाला शक्य होणार आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने रुग्णालयांमध्ये स्वच्छता, आहार आणि रुग्णालयात वापरल्या जाणाऱ्या वस्त्रांची स्वच्छता हे अत्यंत महत्त्वाचे विषय आहेत.

### बोगस दिव्यांग प्रमाणपत्राबाबत चौकशी

त्यामुळे राज्यातील ८ परिमंडळातील ५९३ आरोग्य संस्थांमध्ये यांत्रिक वस्त्र धुलाई सेवा केंद्रे लवकरच सुरू करण्यात येणार आहेत. याचबरोबर राज्य बोगस दिव्यांग प्रमाणपत्राबाबत चौकशीच्या सूचना दिलेल्या आहेत. याबाबत कारवाई सुरू असून, याची सरकारने गंभीर दखल घेतली आहे, , वैद्यकीय शिक्षण विभाग आणि न्याय विभाग या सर्वांच्या सूचना ऐकल्या आहेत.

## थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाई

# थकित मालमत्ता आता थेट जप्त होणार!

## पिंपरी चिंचवड महापालिकेचा मालमत्ता कर थकबाकीदारांना अंतिम इशारा

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड पालिकेच्या कर आकारणी व संकलन विभागामार्फत शहरातील मालमत्ता कर थकबाकीदारांना थकीत रक्कम भरणेबाबत यापूर्वीच मालमत्ता कर थकबाकीदारांना जप्तीपूर्वीची अंतिम नोटीस बजावण्यात आली आहे. आता महापालिका थकित मालमत्ता थेट जप्त करणार असून या मालमत्ता लिहिला होण्याची शक्यता देखील प्रशासनाने वर्तवली आहे.**




पिंपरी चिंचवड कर संकलन विभागाच्या माध्यमातून चालू वर्षाचे मालमत्ता कराचे बिलाचे वाटप सुरू असून मागील आर्थिक वर्षात मालमत्ता कर भरण्याची अंतिम मुदत पहिल्या सहामाहीसाठी ३० सप्टेंबर आणि दुसऱ्या सहामाहीसाठी ३१ डिसेंबर अशी होती अशा ७१ हजार ९९९ थकबाकीदारांनी निर्धारित वेळेत कर भरलेला नसल्यामुळे, या थकबाकीदारांवर प्रत्येक महिन्यासाठी २ टक्के शास्ती (दंड) लागू करण्यात आली आहे. जी संपूर्ण थकबाकी भरणेपर्यंत लागू राहणार आहे. अशा थकबाकीदारांना चालू वर्षाचे बिलासोबत अंतिम जप्तीपूर्व नोटीस वाटपाचे काम सुरू आहे.

महापालिकेने स्पष्टपणे कळवले आहे की, मार्च २०२५ पूर्वीची मालमत्ता कर बिलाची थकबाकी असणाऱ्या ७१ हजार ९९९ थकबाकीधारकांना नोटीस प्राप्त झाल्यानंतर केवळ ७ दिवसांची अंतिम मुदत देण्यात येणार आहे. मालमत्ता थकबाकीदारांना महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून (www. pcmcindia.gov.in) ऑनलाइन पेमेंट गेटवे, RTGS, BBPS किंवा विभागीय कार्यालयांतील थेट भरणा केंद्रांद्वारे रक्कम भरता येईल. आर्थिक अथवा अन्य कारणास्तव कर भरता न आल्यास समाधानकारक कारण लेखी स्वरूपात ७ दिवसांत महापालिकेस सादर करणे आवश्यक आहे. जर या कालावधीत महापालिकेच्या करसंकलन विभागीय कार्यालयात अथवा ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कर न भरल्यास किंवा ती भरण्याबद्दल समाधानकारक कारण न दाखवल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित मालमत्तेवर थेट जप्तीची आणि कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली जाईल. तसेच यामध्ये मालमत्तेचा ताबा घेऊन लिलाव करण्याची तरतूदही समाविष्ट असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

> महानगरपालिकेच्या महसुलामधून शहरातील पायाभूत सेवा, रस्ते, उद्याने, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा यांचे संचालन व विकासकार्य चालते. त्यामुळे प्रत्येक करदात्याची जबाबदारी आहे की त्यांनी वेळेत व नियमित कराचा भरणा करावा. ही अंतिम संधी लक्षात घेऊन तत्काळ थकबाकी भरावी आणि जप्तीची कारवाई टाळावी.
> **-अविनाश शिंदे**, सहाय्यक आयुक्त

## 'पीएमआरडीए' च्या प्रस्तावित कामांसाठी आ. लांडगे "ॲक्शन मोड"वर!

## आयुक्त योगेश म्हसे यांच्या उपस्थितीत मॅरेथॉन बैठक

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए)च्या प्रस्तावित कामांसाठी भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांनी आयुक्त योगेश म्हसे यांच्या उपस्थितीत मॅरेथॉन बैठक घेतली. शहराच्या अनुषंगाने पीएमआरडीअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना आणि विविध विकास प्रकल्पांचा आढावा यावेळी घेण्यात आला. तसेच, प्रलंबित विकास कामांना तातडीने गती द्यावी, निधीसाठी पुरवठा करावा, अशा सूचनाही दिल्या आहेत.**




पुण्यातील 'पीएमआरडीए' प्रशासकीय इमारतीत गुरुवारी (दि 24) बैठक पार पडली. पिंपरी-चिंचवड शहराच्या अनुषंगाने राबवण्यात येणाऱ्या 'पीएमआरडीए'च्या प्रस्तावित योजना व विविध विकास प्रकल्पांबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त योगेश म्हसे, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, मुख्य अभियंता रीनाज पठाण, उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी हिम्मत खराडे, सह महनगर नियोजनकर श्वेता पाटील, सह आयुक्त दीप्ती सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता प्रभाकर वसईकर, कार्यकारी अभियंता अनिता कुलकर्णी आदी उपस्थित होते. आमदार महेश लांडगे यांनी पीएमआरडीएकडील प्रलंबित कामांविषयी तातडीने अंमलबजावणी करण्याची सूचना केली. औद्योगिक प्रदर्शन केंद्र बाबत कालावधी कृती आराखडा करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने नियोजन करावे असे सांगितले. या प्रदर्शन केंद्रासाठी राज्य शासनाकडे 200 कोटी रुपयांची निधीची मागणी केलेली आहे. त्या संदर्भात पाठपुरावा सुरू असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी इंद्रायणी व पवना नदी सुधार प्रकल्प बाबत सादरीकरण केले. केंद्र आणि राज्य शासनाकडून इंद्रायणी व पवना नदी सुधार योजनेसाठी निधी बाबत सद्यस्थिती आमदारांनी जाणून घेतली. इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प नागरिकांच्या भावनांशी जोडलेला असल्याने, तो जलद गतीने (फास्ट ट्रॅक) पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देणे आवश्यक आहे. इंद्रायणी व पवना हे दोन्ही प्रकल्प पिंपरी-चिंचवडकरांच्या आरोग्याशी निगडीत आहेत. या दोन्ही नद्यांमधून महापालिका पाणी उचलते. त्यामुळे नद्या स्वच्छ ठेवायला हव्यात. त्यासाठी उगम ते संगम नदी सुधार प्रकल्पाची अंमलबजावणी करावी आणि नदी सुधार प्रकल्प प्रभावीपणे राबवण्याची आवश्यकता आहे, अशी सूचना आमदार महेश लांडगे यांनी केली.


### प्रदर्शन केंद्राची ओळख शंभूराजांच्या नावाने व्हावी

पीएमआरडीए च्या जागेमध्ये होत असलेले औद्योगिक प्रदर्शन केंद्र पिंपरी चिंचवड शहराची नवी ओळख ठरणार आहे. तर या जागेत होत असलेले धर्मवीर संभाजी महाराजांचे स्मारक 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभषण' हिंदुस्थानचे भूषण ठरणार आहे. त्यामुळे या औद्योगिक प्रदर्शन केंद्राची ओळख "हिंदुभूषण धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र" अशी व्हावी अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली. यावर राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याचे आश्वासन आयुक्त योगेश म्हसे यांनी दिले. तसेच, या प्रदर्शन केंद्राचा सहभाग केंद्र सरकारच्या 'भारत मंडपम' उपक्रमांत समावेश व्हावा, त्यासाठी प्रशासनाने पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे, अशीही सूचना आमदार लांडगे यांनी केली आहे.

### शिक्षण संस्थांना जागेसह मूलभूत सुविधा पुरवा

पुणे शहर विद्येचे माहेर घर आहे. 100 वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या शिक्षण संस्थांनी पिंपरी-चिंचवडमध्ये शाखा विस्तार करावा. यासाठी पीएमआरडीएने सकारात्मक भूमिका घ्यावी. सीईओपी, आयआयएमची शाखा शहरात होते आहे. त्याच धर्तीवर पुण्यातील प्रतिष्ठित फर्ग्युसन, एसपी, ज्ञानप्रबोधनी, सिंम्बायोसिस अशा संस्थांना निमंत्रित करावे. या करिता प्राधिकरणाने भूखंड उपलब्ध करुन द्यावेत. त्यांना मूलभूत सुविधा देखील उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे. त्याअनुषंगाने संबंधित शिक्षण संस्थांची यादी तयार करण्यात येईल व संयुक्त बैठक घेऊन याबाबत सकारात्मक भूमिका घेतली जाईल, असे एकमत करण्यात आले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संत हे आपला संबंध भगवंताशी जोडतात.

आपले हृदय विषयाने इतके भरले आहे, की तिथे भगवंताच्या प्रेमाला जागाच राहिली नाही. बरे, भगवंताचे प्रेम मुद्दाम तिथे घातले, तर ते आत न राहता बाहेर पडते आणि वाऱ्यावर उडून जाते. सामानाने गच्च भरलेली जशी एखादी खोली असते, तसे आपले हृदय आहे. या हृदयाचा संबंध भगवंताशी जोडण्यासाठी, आपल्या हृदयातले सामान, म्हणजे विषय, खाली करून त्याच्या जागी भगवंताचे प्रेम भरणे जरूर आहे. साधारणपणे आपला अनुभव असा आहे की, एखादी वस्तू आपल्याला पुष्कळ आणि पुन्हापुन्हा मिळाली तरी तिचा वीट येतो; म्हणून जी वस्तू आपल्याला कितीही मिळाली तरी तिचा वीट येणार नाही अशी वस्तू आपण मिळवावी. अशी अवीट असणारी वस्तू एकच आहे; ती म्हणजे भगवंत होय.

राजाने आपल्या नावाचा शिक्का केला, आणि जो अती प्रामाणिक होता त्याच्याजवळ दिला; त्याप्रमाणे भगवंताने आपले नाम संतांना दिले. त्यामुळे, संत जे करतील त्याला मान्यता देणे भगवंताला जरूरच आहे. आपण आणि संत यांच्यामध्ये मनुष्य या दृष्टीने फरक नाही; पण फरक आहे तो हा की, संत हा जसे बोलतो तसे वागतो, तर आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट. आपल्या स्वार्थाच्या आड कोणी आले की आपण वाईट बोलतो. ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याच वस्तूवर दुसऱ्याने प्रेम केले तर आपण त्याला नावे ठेवतो. आपण नुसती नीतीची तत्त्वे जेव्हा सांगतो तेव्हा अगदी चांगले बोलतो; पण वागताना मात्र उलट वागतो. यासाठी आपण अशी कृती करू या, की आपल्याला नंतर तसे बोलता येईल.

गाडीत बसायला मिळावे म्हणून काही कोणी गाडीत बसत नाही तर आपल्या स्टेशनाला जाण्यासाठीच मनुष्य गाडीचा आधार घेतो. तसा, मोठमोठ्या संतांनी प्रपंच केला खरा, परंतु तो सुखासाठी केला नाही. आपल्या वृत्तीपासून न ढळता इतरांना तारण्याचे काम संतांनी केले. बुडणाऱ्या माणसाला जसा दोरीचा आधार द्यावा, त्याप्रमाणे संतांनी आपल्याला परमात्म्याचा आधार दिला. चंदनाच्या झाडाजवळच्या झाडांना जसा चंदनाचा वास लागतो, त्याप्रमाणे संताजवळ राहतो तोही संतच बनतो. काही कष्ट न करता परमार्थ साधणे हेच सत्संगतीचे महत्त्व आहे.

**बोधवचन:- आपण प्रपंचात इतके खोल जातो की संतांची हाकच ऐकू येत नाही. ती ऐकू येईल इतक्या तरी अंतरावर असावे.**



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# नतद्रष्ट राजकारण्यांकडून द्वेषाचे विखारी फुत्कार!

**आपल्याला माहीत आहेच, की काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानमधील दहशतवादी संघटना 'लष्कर-ए-तोयबा' चा एक गट 'द रेजिस्टेंस फ्रंट' ने घेतली आहे. तर या हल्ल्याचा कट हा पाकिस्तानमधील मोठे शहर रावळपिंडीत शिजल्याचे स्पष्ट होत आहे. पण भाजपा द्वेषाने पेटलेल्या मंडळींचे काय ?**



### जगच नव्हे, काँग्रेसही पाठीशी.. पण

या हल्ल्यामागे सैफुल्लाह खालीद हा 'मास्टरमाईंड' असल्याचा दावा करण्यात येत आहे. दरम्यान, पाकिस्तान सरकारचा कांगावा यानिमित्त पुन्हा उघड झाला आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा असिफ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जागतिक पातळीवर या हल्ल्याची दखल घेतली गेली. अमेरिकेसह अनेक देशांनी या भ्याड हल्ल्याचा निषेध केला आहे. कधी नव्हे ते विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या प्रसंगी सरकारबरोबर राहण्याचे जाहीर केले आहे. अशावेळी भारतातीलच काही मंडळी ज्या प्रकारे या घटनेचे राजकारण आणि द्वेषाचे विखारी फुत्कार सोडत आहेत, ते पाहता ही मंडळी कोणाची भाषा बोलत आहेत असा प्रश्न पडतो, हे नक्की !

### वाड्रा, संजय राऊत, वडेट्टीवार..

सरकारला मिळालेल्या माहिती नुसार, रावळपिंडीत या हल्ल्याचा कट रचला. यामध्ये सहा दहशतवादी होते. त्यात दोन काश्मीरचे तर चार दहशतवादी हे पाकिस्तानी होते. त्यातील दोन जण हे पाकिस्तानच्या लष्करातील कमांडो असल्याचा दावा करण्यात येत आहे. तर दहशतवादांनी हल्ल्यावेळी बॉडीकॅम कॅमेरा लावल्याचे उघड झाले आहे. इतकी माहिती जाहीर झाली असताना एकेकाळचा राष्ट्रीय जावई रॉबर्ट वाड्रा, उबाठा सेनेचा प्रवक्ता संजय राऊत, कॉंग्रेसचे राज्यातले नेते विजय वडेट्टीवार ही मंडळी, प्रतिक्रियेला सुरूवात हल्ल्याच्या निषेधांनी करतात. मात्र, या हल्ल्याला जबाबदार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह असल्याचे सांगतात, याचा अर्थ हल्ल्याला पंतप्रधान आणि गृहमंत्री जबाबदार आहेत, असे त्यांचे स्पष्ट मत आहे, याला काय म्हणायचे ?

### खरे तर जिभेला लगाम पाहिजे..

अशा वेळी हा वावदूकपणा अत्यंत घातक आहे. याचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर काय परिणाम होऊ शकतात याचा अंदाज संजय राऊत यांना येत नसेल, तर त्यांचा राजीनामा घेतला पाहिजे. नव्हे त्यांना राज्यसभेतून हाकलून दिले पाहिजे. संजय राऊत ही व्यक्ती आणि त्यांचे बोलणे हे दखलपात्र कधीच नव्हते आणि या पुढेही नाही, हे मान्य. पण, अशा अविवेकी बोलण्याने आणि आरोपांमुळे नाईलाजाने त्यांच्या वक्तव्याची दखल घ्यावी लागते, हे महत्त्वाचे आहे. याचे कारण पाकिस्तानचे संरक्षणमंत्री असिफ यांची प्रतिक्रिया वाड्रा आणि राऊत यांच्या प्रतिक्रियेशी मिळतीजुळती आहे, हे लक्षात घ्या!

### किती बेजबाबदार वक्तव्य..

या हल्ल्यामागे भारतातीलच लोक आहेत, भारतात नागालँडपासून ते मणिपूरपर्यंत आणि काश्मीरमधील लोक तिथल्या सरकारविरोधात असल्याचे संतापजनक वक्तव्य असिफ यांनी केले. इतकेच नाही तर केंद्र सरकार तिथल्या नागरिकांचे अधिकार हिसकावून घेत आहेत. त्यांचे शोषण करत आहे. त्यामुळेच लोक त्यांच्याविरोधात असल्याचा कांगावा असिफ यांनी केला. पाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांच्या या बेताल वक्तव्यावर संताप व्यक्त होत आहे. भारतातील कोणताही देशाभिमानी नागरिक संतापच व्यक्त करेल. मात्र, ज्यांना देशाभिमान नाही. केवळ पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्याबद्दल द्वेष आहे, तेच असे विधान करू शकतात. त्यातूनही मोदी आणि शाह यांच्याबद्दल राग, संताप व्यक्त करा. मात्र, त्याचा फायदा शत्रू राष्ट्राला होणार असेल, तर अशावेळी संतुलित बोलणे गरजेचे आहे. अर्थात, हे सांगणे ज्याला शहाणपण आहे..त्याच्या साठी आहे..ज्याची किमान बौद्धिक पातळी शून्याच्याही खाली असेल, अशा मंद व्यक्तीला काय सांगणार ?

### भाजपा द्वेषाचे राजकारण..

हा हल्ला होण्यासाठी भाजपा आणि मोदी यांनी पसरवलेला जातीय द्वेष कारणीभूत आहे. ठार मारताना धर्म विचारला असेल, तर त्याला भाजपाद्वेषाचे राजकारण जबाबदार आहे. देशात द्वेषाचे राजकारण सुरु आहे आणि ते बूमरँग होऊ शकते. आमचे २७ भाऊ मारले गेले, याला अमित शाह जबाबदार नाही का? असा सवाल संजय राऊत यांनी विचारला. आता देशात ३७० कलम रद्द झाले. काश्मीरमध्ये पर्यटन वाढले, या जमेच्या बाजू आणि त्यामुळे दहशतवादी संघटनांमध्ये निर्माण झालेला संताप राऊत, वाड्रा आणि कंपनीला दिसला नाही?

### दहशतवाद्यांच्या वक्तव्याकडे डोळेझाक..

लवकरच आम्ही पाकिस्तान आमच्या ताब्यात घेऊ, गोळ्यांचा पाऊस पाडू ही दहशदवाद्यांची वक्तव्ये राऊतच्या आणि राष्ट्रीय जावयाच्या कानावर पडलेली दिसत नाहीत. दहशतवादी संघटनांच्या नाकी दम येत आहे म्हणून त्यांचा हा प्रकार, हल्ले सुरु आहेत. ओमर अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती यांचे लांगुलचालन होत असताना मुस्कटदाबी झाल्यावर ओमर अब्दुल्ला सहकार्याच्या भूमिकेत निदान दिसण्यापुरता तरी आला आहे. मात्र, रॉबर्ट वाड्रा आणि संजय राऊत वेडाचारात मोदी, शाह यांनाच दोषी ठरवत आहेत. या बौद्धिक दिवाळखोरीस काय म्हणावे हे समजत नाही.

### या नतद्रष्टांच्या तोंडी पाकची भाषा..

या हल्ल्याशी पाकिस्तानचे काही पण देणे घेणे नसल्याचे पाकिस्तान म्हणत आहे. त्यांनी या हल्ल्याचा निषेध केला. नागरिकांवर असा हल्ला व्हायला नको, असे असिफ म्हणाले. पाकिस्तानच्या या प्रतिक्रियेवर अजून भारताकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, भारतातले भाजपा विरोधक ही उणीव पाकिस्तानच्या बाजूने भरून काढत आहे. एकूणच राष्ट्रीय जावई वाड्रा आणि सर्वज्ञानी संजय राऊत यांना आपण काय करतो, हे समजत नाही. त्यांच्या वक्तव्याकडे दुर्लक्ष करून ईश्वरा त्यांना माफ कर, असे म्हणण्याची वेळ आली आहे !

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# न्यू इंडिया बँकेत कोट्यवधींचा अपहार!

## परदेशात गेलेल्या 45 कोटींबाबत ईडीकडून चौकशी सुरू

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक अपहारप्रकरणी ४५ कोटी रुपये परदेशात हस्तांतरित करण्यात आल्याचे काही पुरावे सक्तवसुली संचलनालयाच्या (ईडी) हाती लागले आहेत. ईडीने याप्रकरणी मुंबई व गुजरातमधील सात ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत महत्त्वाचे दस्तऐवज, मालमत्ता संबंधित कागदपत्रे, तसेच सुमारे १ कोटी रुपयांच्या मौल्यवान वस्तू व रोख रक्कम सापडली असून ते जप्त करण्यात आले. छाप्यात याप्रकरणातील महत्त्वाचे पुरावे ईडीच्या हाती लागले आहेत.**




कर्ज खात्यांमधून रक्कम परदेशातील संस्था व कंपन्यांमध्ये वळवण्यात आल्याचे उघड झाले आहे. हे व्यवहार बँकेचे माजी अध्यक्ष हिरन भानू यांच्याशी संबंधित असल्याचा ईडीला संशय आहे. या संदर्भात सापडलेल्या कागदपत्रानुसार हे व्यवहार ४५ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचे असून त्याबाबत ईडीने सखोल चौकशी सुरू केली आहे.बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी देवर्षी घोष यांच्या तक्रारीवरून दादर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१६ (५), ६१ (२) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता.१२२ कोटी रुपयांच्या अपहाराचे हे प्रकरण पुढे मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेला वर्ग करण्यात आले होते. त्याच्याच आधारावर ईडी याप्रकरणी तपास करीत आहे. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने बँकेचा महाव्यवस्थापक हितेश मेहताला अटक केली. मेहताकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे बांधकाम व्यावसायिक धर्मेश पौन याला पोलिसांनी अटक केली. याशिवाय या प्रकरणात बँकेचा तत्कालीन सीईओ अभिमन्यू भोअन याला अटक करण्यात आली. नुकतीच याप्रकरणी चौथा आरोपी मनोहर अरूणाचलम, कपिल देढिया व उन्ननाथन अरूणाचलम यांना अटक करण्यात आली. याशिवाय याप्रकरणातील हिरेन भानू, गौरी भानू सध्या परदेशात असल्याचे समजते.न्यू इंडिया को ऑप बँकेच्या १२२ कोटींच्या आपहारासोबत बुडीत कर्जाची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

याच प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेच्या मागणीनंतर बँकेने २०१० पासून बुडीत कर्ज खात्यांची माहिती आर्थिक गुन्हे शाखेला सुपूर्त केली होती. यामध्ये एका अभिनेत्रीने घेतलेल्या कर्ज खात्याचाही समावेश आहे. मात्र, त्यांना ७३ लाखांची सवलत देत त्यांची कर्जाची रक्कम वसूल करण्यात आल्याचे बँकेच्या माहितीतून उघड झाले आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, कर्ज देतानाही नियमांचे उल्लघन करून लाच घेत जवळपास ४०० कोटींचे कर्ज मंजूर केल्याच्या लेखी अर्जावरून चौकशी सुरू आहे.आरबीआयने बँकेवर दंडात्मक कारवाई केल्याची माहिती समोर येत आहे. याबाबत स्वतंत्र चौकशी सुरू आहे. सीईओ देवर्षी घोष यांना या माहितीसह बोलवण्यात आले आहे. त्यानुसार, त्यांनी जवळपास २०१० पासूनचे नोंदी असलेल्या पुस्तिका आर्थिक गुन्हे शाखेकडे सादर केल्या होत्या. या फाईलची आर्थिक गुन्हे शाखेच्या फॉरेन्सिक ऑडिटरकडून तपासणी सुरू आहे. यामध्ये अभिनेत्रीच्या फाईलचा समावेश आहे.हिंदी चित्रपटसृष्टीतील एका अभिनेत्रीलाही ७ जानेवारी २०११ मध्ये १८ कोटींचे कर्ज मंजूर करण्यात आले होते. ३१ मार्च २०१३ ला कर्जाची परतफेड न झाल्याने खाते बुडीत करण्यात आले.

### अभिनेत्रीलाही कर्जात सवलत

जवळपास ११ कोटी ४७ लाखांची रक्कम थकीत होती. ५ एप्रिल २०१४ मध्ये तडजोडीअंती ७३ लाखांची सूट दिल्यानंतर अभिनेत्रीने १० कोटी ७४ लाख रुपये भरल्याचे कागदोपत्री नोंदीतून निदर्शनास असल्याचे सूत्रांनी सांगितले.कर्ज खात्यांमधून रक्कम परदेशातील संस्था व कंपन्यांमध्ये वळवण्यात आल्याचे उघड झाले आहे. हे व्यवहार बँकेचे माजी अध्यक्ष हिरन भानू यांच्याशी संबंधित असल्याचा ईडीला संशय आहे. या संदर्भात सापडलेल्या कागदपत्रानुसार हे व्यवहार ४५ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचे असून त्याबाबत ईडीने सखोल चौकशी सुरू केली आहे.

# वेव्हज २०२५'साठी ४०० हून अधिक अभियंते

## पालिकेच्या पावसाळापूर्व कामावर परिणाम होण्याची शक्यता

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**केंद्र सरकारच्या 'वेव्हज २०२५' या कार्यक्रमाची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेतील ४०० हून अधिक अभियंत्यांवर सोपविण्यात आली आहे. या कामाला जुम्पल्यामुळे अभियंत्यांमध्ये नाराजी पसरली आहे. तसेच पालिकेच्या पावसाळा पूर्व कामांवर याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**



केंद्र सरकारच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने १ ते ४ मेदरम्यान जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट' (वेव्हज २०२५) या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी ४०० हून अधिक अभियंते आणि प्रमुख विभागांमधील तांत्रिक कर्मचाऱ्यांना तैनात करण्यात आले आहे. या कामाच्या निमित्ताने २६ एप्रिल ते ४ मे या कालावधीसाठी अभियंत्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे अभियंत्यांमध्ये नाराजी पसरली आहे. समाजवादी पार्टीचे आमदार रईस शेख यांनीही या निर्णयाला विरोध केला आहे. त्यांनी अभियंते आणि त्यांच्या संघटनेला पाठिंबा दिला आहे.

पालिका प्रशासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी शेख यांनी केली आहे.केंद्र सरकारच्या 'वेव्हज २०२५'साठी पालिकेने जवळपास ५०० कर्मचारी तैनात केले आहेत. यापैकी सुमारे ४०० अभियंते आणि तांत्रिक कर्मचारी आहेत. हे अभियंते रस्ते, पर्जन्य जलवाहिन्या, पूल यासह इतर विभागातील आहेत. रस्त्यांची कामे, नालेसफाई आणि इतर महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी पावसाळापूर्व तयारीच्या कामांमुळे सध्या कर्मचाऱ्यांची आधीच कमतरता आहे.

तसेच अभियंत्यावर कामाचा अतिरिक्त भार आहे. महापालिकेचे मुख्य काम हे नागरी सेवा सुरळीत पुरवणे असून त्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. सद्यस्थितीत हे अभियंते तैनात करण्याच आल्यामुळे महत्त्वाच्या कामांवर परिणाम होईल. आणि पावसाळ्यात नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागेल,असा आरोप शेख यांनी केला आहे. कार्यक्रम आयोजकांना अशा कामांसाठी आवश्यक तज्ञ असलेले तात्पुरते कर्मचारी सहजपणे नियुक्त करता आले असते, अशी सूचना शेख यांनी केली आहे.म्युनिसिपल इंजिनिअर्स असोसिएशननेही पालिकेच्या या निर्णयाला विरोध केला आहे. या कामासाठी अभियंत्याची नियुक्ती तात्काळ रद्द करावी, अशी मागणी संघटनेने मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र पाठवून केली आहे.

### 400 हून अधिक अभियंते

केंद्र सरकारच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने १ ते ४ मेदरम्यान जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट' (वेव्हज २०२५) या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी ४०० हून अधिक अभियंते आणि प्रमुख विभागांमधील तांत्रिक कर्मचाऱ्यांना तैनात करण्यात आले आहे.

# एक थेंबही पाणी पाकिस्तानला देणार नाही

## पहलगाम हल्ल्यानंतर जलशक्ती मंत्र्यांचे महत्त्वाचे विधान



। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमधील संबंध ताणले हेले आहेत. यादरम्यान या दहशतवादी हल्ल्यात कथित सहभाग असल्याचा बदला म्हणून भारत पाकिस्तानमध्ये पाण्याचा एक थेंबही वाहून जाऊ देणार नाही असे जलशक्ती मंत्री सीआर पाटील यांनी शुक्रवारी म्हटले आहे.**

"भारतातून एक थेंबही पाणी पाकिस्तानात जाणार नाही याची आम्ही काळजी घेऊ," असे सीआर पाटील म्हणाले आहेत.भारताने १९६० चा पाकिस्तानबरोबर करण्यात आलेला सिंधू जल करार रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली पुढील धोरण ठरवण्यासाठी बैठक घेण्यात आली. या बैठकीला उपस्थित राहिल्यानंतर जलशक्ती मंत्र्यांनी हे विधान केले आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार पाटील यांच्या व्यतिरिक्त इतर अनेक मंत्रालयांचे वरिष्ठ अधिकारी या उच्चस्तरीय बैठकीला उपस्थित होते.पाटील म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही निर्देश जारी केले आहेत, आणि त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी ही बैठक बोलवण्यात आली होती. केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी व्यवस्थित व्हावी याकरिता अमित शाह यांनीही काही सूचना दिल्याचे पाटील म्हणाले.त्यानंतर पाटील यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट केली आहे. ज्यामध्ये ते म्हणाले की, सिंधु जल कराराबाबत मोदी सरकारने घेतलेला ऐतिहासिक निर्णय हा कायद्याला धरून आणि राष्ट्रहिताचा आहे. सिंधू नदीचे एक थेंबही पाणी पाकिस्तानात जाणार नाही याची आम्ही काळजी घेऊ." भारताने पाकिस्तानला आम्ही दहशतवाद सहन न करण्याबाबत कठोर भाषेत संदेश दिला आहे, असेही भाजपा नेते पाटील म्हणाले.

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला जबाबदार धरत भारताने पाकिस्तानची राजनैतिक कोंडी करण्यास सुरूवात केली आहे. बुधवारी (२३ एप्रिल) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षणविषयक केंद्रीय समितीच्या (सीसीएस) बैठकीनंतर १९६०च्या 'सिंधू जल करारा'स स्थगिती देण्याचा निर्णय घेतला गेला. यानंतर इस्लामाबाद येथे गुरूवारी पाकिस्तानच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची आणि मंत्री गटाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर भारताबरोबर झालेले सर्व द्विपक्षीय करार स्थगित करण्याचा अधिकार पाकिस्तान वापरू शकतो, असे पाकिस्तानने म्हटले. गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी (२५ एप्रिल) सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांबरोबर संवाद साधत पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चर्चा केली. तसेच यावेळी त्यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना 'पाकिस्तानी नागरिकांना शोधा आणि तात्काळ परत पाठवा', अशा सूचना दिल्या आहेत.जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर मोदी सरकारने कठोर पाऊल उचलत पाच मोठे निर्णय घेतले आहेत. त्यानुसार १९६० चा सिंधू पाणी करार तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आला आहे. जोपर्यंत पाकिस्तान दहशतवादाला खतपाणी घालत राहील तोपर्यंत हा करार स्थगित राहील. तसेच संयुक्त चेकपोस्ट अटारी तात्काळ प्रभावाने बंद करण्यात आली आहे. ज्यांनी वैध मार्गाने अटारी सीमा ओलांडली आहे, ते १ मे २०२५ पूर्वी त्या मार्गाने परत येऊ शकतात असे भारत सराकरने म्हटले आहे. पाकिस्तानी नागरिकांना सार्क व्हिसा सवलत योजनेअंतर्गत भारतात प्रवास करण्याची परवानगी रद्द करण्यात आली आहे. यापूर्वी पाकिस्तानी नागरिकांना जारी केलेले व्हिसा रद्द मानले जातील. तसेच एसव्हीईएस व्हिसाद्वारे सध्या भारतात असलेल्या सर्व पाकिस्तानी नागरिकांनी तत्काळ भारत सोडावा लागेल.

### सिंधू जल करार रद्द करण्याचा निर्णय

नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील संरक्षण, लष्करी, नौदल आणि हवाई अधिकाऱ्यांनी एका आठवड्यात भारत सोडावा सादेस. भारताने इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयातून स्वतःचे संरक्षण, नौदल आणि हवाई सल्लागारांना माघारी बोलवण्याचा निर्णय घेतला आहे."भारतातून एक थेंबही पाणी पाकिस्तानात जाणार नाही याची आम्ही काळजी घेऊ," असे सीआर पाटील म्हणाले आहेत.भारताने १९६० चा पाकिस्तानबरोबर करण्यात आलेला सिंधू जल करार रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली पुढील धोरण ठरवण्यासाठी बैठक घेण्यात आली.

# २२९ पाकिस्तानी नागरिकांना माघारी पाठवले

## पाकिस्तानी नागरिकांना 48 तासांच्या आत भारत सोडण्याचे आदेश



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ भारतीयांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर, भारत सरकारने कठोर कारवाई केली आहे. भारताने सार्कद्वारे पाकिस्तानी नागरिकांना दिलेले व्हिसा रद्द केले आहेत. भारताने पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्यासाठी ४८ तासांचा कालावधी दिला आहे. यानंतर पाकिस्तान सरकारनेही भारतीयांना दिलेले व्हिसा रद्द केले आहेत.**

दरम्यान, पाकिस्तानी नागरिक पंजाबमधील अमृतसरमधील अटारी-वाघा बॉर्डर क्रॉसिंगद्वारे पाकिस्तानात परत येत आहेत. आतापर्यंत १९१ पाकिस्तानी नागरिक भारतातून पाकिस्तानात गेले आहेत. तर २८७ भारतीय पाकिस्तानातून भारतात परतले आहेत. पाकिस्तानात विवाहित असूनही, भारतीय पासपोर्ट असलेल्या काही महिला म्हणत आहेत की, आवश्यक कागदपत्रे असूनही त्यांना काही समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.जम्मू-काश्मीरमधील पहलगाम जिल्ह्यात दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात अलीकडेच २६ जणांचा मृत्यू झाला होता. यानंतर, भारत सरकारने कारवाई करण्यास सुरुवात केली आणि परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी करुन, पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत.

याचबरोबर, भारत सरकारने सिंधू पाणी करार देखील स्थगित केला आहे. याशिवाय, पाकिस्तानमधील भारतीय दूतावासाची क्षमताही कमी करण्यात आली आहे. तसेच, वाघा-अटारी सीमा देखील बंद करण्यात आली आहे."आज, अटारी सीमेवरून १९१ पाकिस्तानी नागरिक पाकिस्तानला रवाना झाले आहेत.

तर, २८७ भारतीय नागरिक पाकिस्तानातून परतले आहेत. काल, अटारी सीमेवरून २८ पाकिस्तानी नागरिक पाकिस्तानला रवाना झाले. गेल्या दोन दिवसांत अटारी सीमेवरून एकूण २२९ पाकिस्तानी नागरिक पाकिस्तानला रवाना झाले आहेत. गेल्या दोन दिवसांत एकूण ३९२ भारतीय नागरिक पाकिस्तानातून परतले आहेत", अशी माहिती पंजाब पोलीस प्रोटोकॉल अधिकारी अरुण महल यांनी दिली आहे.मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या सुरक्षा विषयक समितीची बैठक बोलावण्यात आली होती, ज्यामध्ये पाकिस्तानी नागरिकांना माघारी पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परराष्ट्र मंत्रालयाने २४ एप्रिल रोजी एक निवेदन जारी करून म्हटले आहे.

### 392 भारतीयही मायदेशी परतले

व्हिसा संबंधित हे नियम हिंदू असलेल्या आणि भारतात राहण्यासाठी दीर्घकालीन व्हिसा मिळालेल्या पाकिस्तानी नागरिकांना लागू होणार नाहीत. तसेच, जे लोक वैध कागदपत्रांसह पाकिस्तानला गेले आहेत त्यांना १ मे पूर्वी भारतात येण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

# ‘छावा’ चित्रपटाबद्दल आणि ट्रोलिंगबद्दल आस्ताद काळेने मांडली त्याची बाजू

विकी कौशलच्या ‘छावा’ या चित्रपटाची जोरदार चर्चा झाली. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर ६०० कोटींपेक्षा जास्त कमाई केली. प्रदर्शनाच्या पुर्वीपासूनच हा चित्रपट अनेक कारणांनी चर्चेत होता. याबद्दल अनेक संमिश्र प्रतिक्रिया कलाकार व प्रेक्षक व्यक्त करत होते. याशिवाय शिर्केंच्या वंशजांनी देखील चित्रपतावर आक्षेप घेतला होता. अशातच काही दिवसांपुर्वी मराठी अभिनेता आस्ताद काळेने ‘छावा’बद्दल एक पोस्ट शेअर केली होती. २ महिन्यांनी आस्तादने फेसबुक पोस्ट शेअर करत या चित्रपटातील खटकलेले मुद्दे उपस्थित केले होते. “‘छावा’ वाईट फिल्म आहे” असं म्हणत आस्तादने पोस्ट शेअर केली होती. या पोस्टमुळे त्याला ट्रोलिंगचाही सामना करावा लागला होता. अशातच आता या सगळ्यावर अभिनेत्याने भाष्य केलं आहे. राजश्री मराठीशी बोलताना त्याने याबद्दल सविस्तरपणे त्याचं मत मांडलं. याबद्दल तो म्हणाला की, “माझं



वैयक्तिक मत आहे आणि ते मत असण्याचा मला संविधानाने अधिकार दिलेला आहे. मला तो चित्रपट आवडला नाही. माझा त्या पोस्टमधला शब्द चुकला असेल. ‘फिल्म वाईट आहे’ असं म्हणण्यापेक्षा ‘मला ती फिल्म आवडली नाही’ असं म्हणणं जास्त चांगलं ठरलं असतं.”यापुढे तो म्हणाला, “यामुळे येणाऱ्या प्रतिक्रिया तशाच आल्या असत्या. त्याबद्दल माझं काही मत नाही. काही जणांनी मला वैयक्तिकरित्या फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर विचारलं. त्यावर त्यांना मी माझं म्हणणं सांगितलं आणि त्यातल्या काहींना ते पटलं देखील.

## निर्मात्याला घरी बोलावलं

प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांनी मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीतही त्यांची वेगळी ओळख निर्माण केली. ‘क्रांतिवीर’ चित्रपटातील त्यांचा ‘आ गए मेरी मौत का तमाशा देखने’ असो वा ‘नटसम्राट’ चित्रपटातील ‘कोणी घर देता का घर’ हा डायलॉग असो; नाना पाटेकरांनी त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. नाना पाटेकरांबरोबर काम केलेले अनेक कलाकार मुलाखतींमध्ये त्यांच्याबद्दल वक्तव्य करीत असतात. आता लोकप्रिय अभिनेते परेश रावल यांनी एका मुलाखतीत नाना पाटेकरांबाबत केलेले वक्तव्य चर्चेत आहे. परेश रावल यांनी ‘द लल्लनटॉप’ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी नाना पाटेकरांचा किस्सा सांगितला. परेश रावल म्हणाले, “एक निर्माता आहे. त्याचं नाव मी सांगणार नाही. त्याला नानांनी घरी बोलावलं. त्याला विचारलं की, तू मटण वगैरे खातोस का? तो निर्माता नानांच्या घरी आला, त्यानं जेवण केलं. त्याला मटण खाऊ घातलं. त्यानंतर नाना त्याला म्हणाले की, आता खाल्लंस ना, मग आता भांडी स्वच्छ कर. नाना पाटेकर बाप आहे. वेगळ्या मातीचा बनलेला आहे. पुढे परेश रावल म्हणाले, “जेव्हा नाना पाटेकर कॅरॅक्टर आर्टिस्ट म्हणून काम करीत होते, तेव्हा त्यांनी त्यांच्या भूमिकेसाठी एक कोटी रुपये मानधनाची मागणी केली होती. त्यावेळी नायकदेखील तितके मानधन मागत नसत. नाना पाटेकरांनी तितके मानधन मागितले आणि महत्त्वाचे म्हणजे त्यांना तितके मानधन

## सिद्धार्थसह झळकली गौरी!



प्रत्येक कलाकाराची आयुष्यात कधीतरी त्यांच्या आवडत्या कलाकारांबरोबर स्क्रीन शेअर करता यावी, अशी इच्छा असते. त्यासाठी कलाकार मेहनत घेत असतात. या मेहनतीला कधी न कधी यश हे मिळतंच. असंच यश एका प्रसिद्ध मराठमोळ्या अभिनेत्रीला मिळालं आहे. या अभिनेत्रीचं बॉलीवूड अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रासह काम करण्याचं स्वप्न पूर्ण झालं आहे. ही अभिनेत्री म्हणजे गौरी नलावडे.अभिनेत्री गौरी नलावडे हिनं आजवर मालिका, चित्रपटांमध्ये काम करीत प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. सुंदर,सोज्वळ अशा भूमिका करत तिनं तिचा एक वेगळा चाहतावर्ग निर्माण केला आहे. अभिनयासह गौरी सोशल मीडियावरही सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. परंतु, सध्या गौरी एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे.गौरीनं नुकतंच एका जाहिरातीत काम केलं आहे. सध्या तिची ही जाहिरात अनेकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे. याचं कारण म्हणजे यामध्ये गौरी एका वेगळ्याच रूपात पाहायला मिळत आहे. गौरीनं ‘माचो’ या ब्रँडची जाहिरात केली असून, त्यामध्ये ती एका बार टेंडरच्या भूमिकेत पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे तिच्यासह या जाहिरातीत बॉलीवूड स्टार सिद्धार्थ मल्होत्रा असल्याचं पाहायला मिळतं. सिद्धार्थसह गौरीचा बॉल्ड अंदाज या जाहिरातीत दिसत आहे. या जाहिरातीतून गौरी पहिल्यांदाच सिद्धार्थ मल्होत्रासह झळकली आहे.एरवी सोज्वळ भूमिकांमध्ये दिसणारी गौरी आता मात्र एका वेगळ्याच अंदाजात पाहायला मिळत असल्यानं याबद्दल बरीच चर्चा होताना दिसते. तर गौरीनंही तिच्या या जाहिरातीबद्दल सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. या पोस्टखाली तितीक्षा तावडे, आरती मोरे, अभिजीत खांडकेकर,कमेंट्स करीत तिचं अभिनंदन केलं आहे. त्यासह गौरीच्या चाहत्यांनादेखील तिची ही जाहिरात आवडली असून, त्यांनी कमेंट्स करीत गौरीच्या या कामाचं कौतुक केलं आहे.

## परवीन बाबींना उपचार घेण्याबाबत सांगितले

बॉलीवूडमधील अनेक लोकप्रिय अभिनेत्रींमध्ये परवीन बाबींचे नाव घेतले जाते. त्यांच्या अभिनयाची चर्चा आजही होताना दिसते. मात्र, त्यांच्या चित्रपटांची जितकी चर्चा होते, तितकीच त्यांच्या खासगी आयुष्याचीदेखील चर्चा होताना दिसते. कबीर बेदी व परवीन बाबी रिलेशनशिपमध्ये होते. जेव्हा कबीर बेदींना परवीनच्या मानसिक आरोग्यामुळे त्यांची प्रकृती खाालवत आहे, असे जाणवले. तेव्हा त्यांनी परवीन बाबींना उपचार घेण्याबाबत सांगितले. मात्र, त्यांच्या आजाराबाबत इंडस्ट्रीला समजेल आणि त्यामुळे करिअरवर परिणाम होईल म्हणून परवीन बाबींनी उपचार घेण्यास नकार दिला आणि कबीर बेदींबरोबरचे नाते संपवले.



## माधुरीचे सासू-सासरे झाले नाराज!


बॉलीवूडचा स्टार अभिनेत्री माधुरी दीक्षितने १९९१ मध्ये डॉ. श्रीराम नेनेंशी लग्न केलं. लग्नानंतर माधुरी अमेरिकेत राहण्यास गेली. तिचे पती त्यावेळी डेनवर येथे हृदयरोग शल्यचिकित्सक ( CARDIAC SURGEON ) म्हणून कार्यरत होते. आता पती अन् सासरचे लोक परदेशात राहणारे असल्याने माधुरीचं भारतात येणं कालांतराने कमी होऊ लागलं. हळुहळू अभिनेत्री बॉलीवूडपासून दुरावली आणि संसारात रमली. लग्नानंतर माधुरीला दोन मुलं झाली. मुलांच्या जन्मानंतर तिने इंडस्ट्रीपासून काही वर्षे ब्रेक घेतला. यानंतर २००७ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘आजा नचले’ सिनेमातून तिने रुपेरी पडद्यावर कमबॅक केलं. तसेच, काही टेलिव्हिजन शोमध्ये माधुरीने परीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली आणि पुढच्या काही वर्षांतच ‘धकधक गर्ल’ कुटुंबीयांसह भारतात परतली. तिचे पती डॉ. श्रीराम नेनेंनी अमेरिकेतील हार्ट सर्जनची नोकरी सोडून वैद्यकीय सल्लागार व उद्योजक म्हणून काम करण्यास सुरुवात केली, ते २०११ मध्ये भारतात आले. हा निर्णय त्यांच्या आई-वडिलांना म्हणजे माधुरीच्या सासू-सासऱ्यांना पटला नव्हता. याबद्दल डॉ. नेने नेमकं काय म्हणाले आहेत जाणून घेऊयात...डॉ. नेने सांगतात, “मी मूळचा भारतीय आहे. पण, लहानपणापासून दुसऱ्या देशात स्थलांतरीत नागरिक म्हणून वाढलो.

# हैदराबादचा चेन्नईवर ऐतिहासिक विजय!

## चेपॉकचा अभेद्य गड सनरायझर्सने पहिल्यांदाच भेदला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सनरायझर्स हैदराबादने आयपीएल २०२५ मध्ये चेन्नई सुपर किंग्सचा पराभव करत मोठा ऐतिहासिक विजय मिळवला आहे. हैदराबादने चेन्नईवर ५ विकेट्स आणि ८ चेंडू शिल्लक ठेवत विजयाची नोंद केली. हैदराबादने आयपीएलच्या १८ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच चेन्नईचा चेपॉकवर पराभव केला आहे. फॉर्मात नसलेल्या नितीश रेड्डीने आणि कामिंदू मेंडिसने अखेरच्या षटकांमध्ये संघाला विजयापर्यंत नेलं.**



या विजयासह हैदराबादचा संघ गुणतालिकेत आठव्या स्थानी पोहोचला आहे.गुणतालिकेत अखेरच्या क्रमांकावर असलेल्या चेन्नई आणि हैदराबादमध्ये हा सामना खेळवला गेला. दोन्ही संघांसाठी या सामन्यातील विजय होता आणि हैदराबादने विजय आपल्या दिशेने वळवला. या हंगामात सनरायझर्सचा ९ सामन्यांतील हा तिसरा विजय आहे आणि संघ पॉइंट्स टेबलमध्ये ९व्या स्थानावरून ८व्या स्थानावर पोहोचला आहे. चेन्नईचा हा इतक्याच सामन्यांमधील सातवा पराभव आहे आणि संघ दहाव्या क्रमांकावर कायम आहे.सनरायझर्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि मोहम्मद शमीने पहिल्याच चेंडूवर विकेट घेत संघाला चांगली सुरुवात करून दिली.

यानंतर युवा फलंदाज आयुष म्हात्रेने जोरदार फटकेबाजी केली पण तोही पॉवरप्लेमध्ये बाद झाला आणि चेन्नईने फक्त ४७ धावांत ३ विकेट गमावल्या.यानंतर चेन्नईसाठी पदार्पण करणाऱ्या युवा फलंदाज डेवाल्ड ब्रेविसने संथ सुरुवातीनंतर आक्रमक फलंदाजी करत षटकारांचा पाऊस पाडला. पण कामिंदू मेंडिसच्या थक्क करणाऱ्या झेलमुळे तो पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर, हर्षल पटेल आणि पॅट कमिन्स यांनी संघाला लवकर धावा करू दिल्या नाहीत आणि संघ १९.५ षटकांत १५४ धावांवर ऑलआउट झाला.चेन्नईने दिलेल्या १५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादची सुरुवातही फारशी चांगली झाली नाही. अभिषेक शर्माही खाते न उघडता पहिल्याच षटकात झेलबाद झाला. यानंतर ट्रॅव्हिस हेडही पॉवरप्लेच्या अखेरच्या षटकात झेलबाद झाला. यानंतर जडेजाने क्लासेनला झेलबाद केलं. इशान किशनने मधल्या षटकांमध्ये वादळी फलंदाजी करत संघासाठी महत्त्वपूर्ण धावा केल्या आणि ४४ धावांवर झेलबाद झाला.यानंतर अनिकेत वर्मा १९ धावा करत १४व्या षटकात बाद झाला. पण कामिंदू मेंडिस आणि नितीश रेड्डीने संघाला विजयापर्यंत नेले. कामिंदू मेंडिस २२ चेंडूत ३ चौकारांसह ३२ धावा करत नाबाद राहिला. तर नितीश रेड्डीने २ चौकारांसह १९ धावा करत चांगली साथ दिली. यासह हैदराबादने १८.४ षटकांत १५५ धावा करत सामन्यात शानदार विजय मिळवला. या विजयासह हैदराबादचा संघ गुणतालिकेत आठव्या स्थानी पोहोचला आहे.

गुणतालिकेत अखेरच्या क्रमांकावर असलेल्या चेन्नई आणि हैदराबादमध्ये हा सामना खेळवला गेला. दोन्ही संघांसाठी या सामन्यातील विजय होता आणि हैदराबादने विजय आपल्या दिशेने वळवला. या हंगामात सनरायझर्सचा ९ सामन्यांतील हा तिसरा विजय आहे आणि संघ पॉइंट्स टेबलमध्ये ९व्या स्थानावरून ८व्या स्थानावर पोहोचला आहे.

चेन्नईचा हा इतक्याच सामन्यांमधील सातवा पराभव आहे आणि संघ दहाव्या क्रमांकावर कायम आहे. सनरायझर्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि मोहम्मद शमीने पहिल्याच चेंडूवर विकेट घेत संघाला चांगली सुरुवात करून दिली.

### जडेजाने क्लासेनला झेलबाद केलं

यानंतर युवा फलंदाज आयुष म्हात्रेने जोरदार फटकेबाजी केली पण तोही पॉवरप्लेमध्ये बाद झाला आणि चेन्नईने फक्त ४७ धावांत ३ विकेट गमावल्या.यानंतर चेन्नईसाठी पदार्पण करणाऱ्या युवा फलंदाज डेवाल्ड ब्रेविसने संथ सुरुवातीनंतर आक्रमक फलंदाजी करत षटकारांचा पाऊस पाडला. पण कामिंदू मेंडिसच्या थक्क करणाऱ्या झेलमुळे तो पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर, हर्षल पटेल आणि पॅट कमिन्स यांनी संघाला लवकर धावा करू दिल्या नाहीत आणि संघ १९.५ षटकांत १५४ धावांवर ऑलआउट झाला.चेन्नईने दिलेल्या १५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादची सुरुवातही फारशी चांगली झाली नाही. अभिषेक शर्माही खाते न उघडता पहिल्याच षटकात झेलबाद झाला. यानंतर ट्रॅव्हिस हेडही पॉवरप्लेच्या अखेरच्या षटकात झेलबाद झाला. यानंतर जडेजाने क्लासेनला झेलबाद केलं.

# कामिंदू मेंडिसचा थक्क करणारा कॅच!

## आयपीएल 2025 मधील कॅच ऑफ द टूर्नामेंट म्हटला जाईल

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयपीएल २०२५ मधील कॅच ऑफ द टूर्नामेंट म्हटला जाईल असा कमालीचा झेल चेन्नई सुपर किंग्स वि. सनरायझर्स हैदराबाद सामन्यात पाहायला मिळाला. या सामन्यात हैदराबादने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. गोलंदाजी करताना चेन्नईकडून डेवाल्ड ब्रेविस उत्कृष्ट फलंदाजी करत होता.**




माघारी धाडण्यासाठी तशाच कामगिरीची गरज होती आणि कामिंदू मेंडिसने सीमारेषेजवळ थक्क करणारा झेल टिपला. ज्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे. या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने प्रथम फलंदाजी केली पण त्यांचे फलंदाज पुन्हा एकदा दमदार कामगिरी करण्यात अपयशी ठरले. १७ वर्षीय फलंदाज आयुष म्हात्रेने निश्चितच एक छोटी पण वादळी खेळी केली आणि संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पण त्याच्याशिवाय, एका फलंदाजाने आपली प्रतिभा दाखवली आणि तो होता डेवाल्ड ब्रेव्हिस, ज्याने सीएसकेसाठी या सामन्यात पदार्पण केले.डेवाल्ड ब्रेव्हिसने फक्त २४ चेंडूत ४२ धावा केल्या होत्या आणि तो संघाला मोठ्या धावसंख्येकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न करत होता. पण २५ व्या चेंडूवर त्याने अद्भुत क्षेत्ररक्षणामुळे आपली विकेट गमावली. १३ व्या षटकात, ब्रेविसने हर्षल पटेलचा चेंडू पूर्ण ताकदीने खेळला आणि चेंडू बुलेटच्या वेगाने लाँग ऑफच्या दिशेने सीमा ओलांडताना दिसला. पण तिथेच तैनात असलेल्या मेंडिसने डावीकडे धाव घेतली, एक लांब डाईव्ह घेत दोन्ही हातांनी चेंडू हवेत पकडला.ब्रेविसने फटका मारलेला चेंडू चज्या वेगाने आला तो लक्षात घेता, मेंडिसने झेल घेऊन सर्वांना आश्चर्यचकित केले. या एका झेलमुळे ब्रेविसला माघारी धाडलं आणि चेन्नईच्या धावांच्या गतीला ब्रेक लागला. अर्थातच हा या हंगामातील सर्वोत्तम झेल होता. मेंडिसने कमालीचा झेल टिपल्यानंतर दिलेल्या प्रतिक्रियेनेही सर्वांचं लक्ष वेधलं.मेंडिसने केवळ त्याच्या क्षेत्ररक्षणातच चमकदार कामगिरी केली नाही तर त्याच्या गोलंदाजीने संघाला मोठे यशही मिळवून दिले. मेंडिसने आपल्या ऑफ-स्पिन गोलंदाजीने चेन्नईचा स्टार अष्टपैलू रवींद्र जडेजाला त्रिफळाचीत केलं आणि चेन्नईच्या धावांना ब्रेक लावलाती आणि कामिंदू मेंडिसने सीमारेषेजवळ थक्क करणारा झेल टिपला. ज्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.

### ज्याचा व्हीडिओ व्हायरल झाला

या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने प्रथम फलंदाजी केली पण त्यांचे फलंदाज पुन्हा एकदा दमदार कामगिरी करण्यात अपयशी ठरले. १७ वर्षीय फलंदाज आयुष म्हात्रेने निश्चितच एक छोटी पण वादळी खेळी केली आणि संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पण त्याच्याशिवाय, एका फलंदाजाने आपली प्रतिभा दाखवली .

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
। शनिवार ।
। दि. 26 एप्रिल 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




For more info
95277 64646 / 77967 67292


ADMISSION OPEN
From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Moaraya Shikshan Sanstha
Computer Vacation
Batch
Our Courses
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> 'C ++' Language
> Basic Java
> Basic Tally
> M. S. Office
Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7
STAR
RANKING
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com